: शोधप्रबंधाचा आराखडा :

मानव्यविद्या शाखेअंतर्गत **अर्थशास्त्र** विषयात पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

या विद्यापीठास सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधन शीर्षक :

"बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका" (२०१०-११ ते २०१९-२०)

: संशोधक :

शेख रियाज शेख मुनिर

: मार्गदर्शक :

डॉ.आर.एम. भालेराव

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

शारदा महाविद्यालय, परभणी

: संशोधन केंद्र :

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

परभणी

जुलै २०२२

"बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगीक क्षेत्राची भूमिका" (२०१०-११ ते २०१९-२०)

प्रस्तावना (Introduction) :

भारत हा कृषिप्रधान देश आहे. १९५१ मध्ये ७० टक्के रोजगार हा कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत होता. देशांतर्गत उत्पन्नात कृषीचा वाटा हा ५६.५ टक्के इतका होता. म्हणजेच रोजगार व उत्पन्नाच्या बाबतीत कृषीचा वाटा हा सर्वाधिक होता. विल्सन बार्करबर्सोडी यांच्या मते, "शेती अर्थव्यवस्थेतील मुलभूत क्षेत्र होय, कारण जागतिक लोकसंख्येचा विचार करता अद्यापही बहुसंख्य लोक उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. मानवाची प्राथमिक गरज अन्न हे शेती क्षेत्र पूर्ण करते. आणि अनेक उद्योगांना लागणारा कच्चा माल पुरविण्याचे काम शेतीतून होते. काही कमी विकसित अर्थव्यवस्था प्राथमिक उत्पन्नाच्या मुख्यत्वे शेतमालाच्या निर्यातीवर अवलंबून असतात. म्हणून शेती हाच खरा मूलभूत व्यवसाय आहे असे म्हटले जाते." या विधानावरुन असे लक्षात येईल की, आर्थिक विकासासाठी शेती ही किती महत्वपूर्ण आहे. कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबरच औद्योगिक क्षेत्राचाही विकास होत असतो. कारण औद्योगीकीरणाला आवश्यक असणारा कच्चा माल हे बऱ्याच प्रमाणात शेतीतून पुरविला जातो. साखर, कापड , खाद्यतेल उद्योगाला लागणारा कच्चामाल कृषी क्षेत्रातून उपलब्ध होत असतो.

अर्थव्यवस्थेचे विविध क्षेत्र (प्राथमिक, व्दितीय, तृतीय) परस्पर पूरक असल्याने कोणत्याही एका क्षेत्राचे महत्त्व जास्त राहू शकत नाही. शेतीच्या विकासाशिवाय अनेक उद्योगांचा विकास होणार नाही. तसेच काही उद्योगाच्या विकासाशिवाय शेतीचा विकास होणार नाही जसे की, रासायनिक खते, शेती अवजारे, कीटक नाशके, बी-बियाणे. शेतीच्या विकासासाठी अशा मूलभूत उद्योगांचा विकास होणे आवश्यक असते. कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये औद्योगीकीकरणाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. भारतासारख्या विकसनशील देशात औद्योगिकीकरणामुळे शेती क्षेत्रावरील लोकसंख्येचा भार कमी होतो. उत्पादकतेमध्ये वाढ होते, रोजगार निर्मिती वाढते, दुसऱ्या शब्दात औद्योगिकीकरणामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढते. भारताचे

पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या मते “खरी प्रगती शेवटी औद्योगिकीकरणावरच अवलंबून असते” (Real progress must ultimately depends on industrialisation-Nehru १९५३)

औद्योगिक क्रांतीचे टप्पे :

पहिला टप्पा : १७५० ते १८५० पर्यंतचा आहे. औद्योगिक क्रांतीचा उदय झाला व तिचा प्रसार पूर्व युरोपियन फ्रान्स आणि जर्मनी या देशात झाला.

दुसरा टप्पा : हा १८५० ते १९५० पर्यंतचा आहे. यामध्ये औद्योगिक क्रांतीचा प्रसार रशिया, भारत, जपान, या देशात झाला

तिसरा टप्पा :हा टप्पा १९५० नंतर सुरु झाल व तो आजपर्यंत चालू आहे. आशिया व आफ्रिका खंडात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमध्ये.

भारताच्या औद्योगिकीकरणाची सुरुवात औद्योगीक क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात सुरु झाली तरी, खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारताचे पहिले औद्योगिक धोरण ८ एप्रिल १९४८ रोजी जाहीर झाले व औद्योगिक विकासाला सुरुवात झाली. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांत कृषीमध्ये छुपी बेरोजगारी फार मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते. ज्यांची सीमांत उत्पादकता शून्य असते. हे श्रमिक जर उद्योगाकडे वळविले तर शेतीच्या उत्पन्नात काही परिणाम होणार नाही व त्याचबरोबर उद्योगाला श्रमिक मिळतील. विकसनशील राष्ट्रांमध्ये कृषी-आधारित उद्योगांचा विकास लवकर होऊ शकतो कारण कच्चा माल, श्रमिक मोठया प्रमाणात उपलब्ध होऊ शकतात.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे तर, क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची एकूण लोकसंख्या ११,२३,७४,३३३ इतकी आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.२८ टक्के इतके आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात प्रथम क्रमांकाचे औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. राज्याचा देशांतर्गत उद्योगातील वाटा १८.० टक्के इतका आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण कृषी योग्य जमीन २२५ लक्ष्य हेक्टर असून ४० लक्ष हेक्टर जमिनीवर सिंचन सुविधा आहे. महाराष्ट्रामध्ये कापूस, ऊस, ज्वारी, बाजरी, गहू, सोयाबीन, कडधान्य इत्यादी पिके घेतली जातात. महाराष्ट्रा मध्ये साखर

कारखाने, तेल मिल, सुतगिरणी इत्यादी कृषी आधारित उद्योग आहेत. तसेच यंत्रनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक, धातु शुध्दीकरण, औषध निर्माण, सॉफटवेअर, फिल्म उद्योग बांधकाम इत्यादी उद्योगांचा समावेश होतो.

बुलडाणा जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ९,६६१ चौ. की. आहे. एकुण महाराष्ट्र राज्याच्या ३.१४ टक्के इतके आहे. २०११ जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५.८८ लक्ष एवढी आहे. जिल्ह्याची लोकसंख्या घनता २६८ पर चौ.की. इतकी आहे . बुलडाणा जिल्हा मराराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई पासून ५०० की.मी. अंतरावर आहे. राज्याची उपराजधानी नागपूर पासून ३५० की.मी. अंतरावर आहे. जिल्ह्यातील जमिनीमध्ये नत्र, स्फुरद, पालाश यांचे प्रमाण अनुक्रमे १.०४, १.२६, २.३९ इतके आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने वैनगंगा, पैनगंगा, खडक पूर्णा इत्यादी नद्या आहेत. ज्वारी, कापूस, सोयाबीन, ऊस, कडधान्य इत्यादी पिके घेतली जातात. जिल्ह्यामध्ये नोंदणीकृत औद्योगिक युनिट १४३४ इतके आहे. लघु व कुटीर उद्योगांमध्ये ११,४९३ इतका रोजगार कार्यरत आहे. मोठे उद्योग १२ व मध्यम उद्योग ११ असुन, व त्यामध्ये एकूण रोजगार ५,५७३ कार्यरत आहे.

संशोधन साहित्याचे पुनरावलोकन (Review of the research) :

संशोधनाची उदिष्टे साध्य करण्यासाठी व संशोधन विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी संशोधन विषयाशी संबंधित संशोधन पूर्व अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या संबंधित काही संशोधन साहित्याची निवड करुन अभ्यास केले गेले आहे. असे काही साहित्याचे पुनरावलोकन पुढील प्रमाणे.

१. **अशोक कुमार सिंह (२००७) :** यांनी "जागतिक व्यापार संघटन, भारतीय कृषि समोरील समस्या" या लेखामध्ये कृषी चे जागतिक व्यापरातील योगदान, तसेच कृषी उत्पादनातील गुणवत्ता वाढविण्यासाठी, उत्पादन लागत कमी करणे, विक्री मूल्य कमी करणे व आंतरराष्ट्रीय बाजाराच्या मागणी अनुरुप कृषी उत्पादन करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

२. **डॉ. राधा मोहन श्रीवास्तव (२००२) :** यांनी "कृषी, राष्ट्रीय संसाधन आणि गामीण विकास" या लेखामध्ये कृषीमध्ये रोजगार उपलब्ध करण्यासाठी मोठया प्रमाणावर औद्योगिकीकरणवर भर दिला.

३. **दुसरी पंचवार्षिक योजना (०१ एप्रिल १९५६ ते ३१ मार्च १९६१) :** दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिकीकरणाच्या कार्यक्रमाला सर्वात जास्त प्राधान्य देण्यात आले. मूलभूत व अवजड उद्योगांच्या विकासावर या योजनेत भर देण्यात आला. या योजनेतील औद्योगिकीकरणाचा कार्यक्रम हा १९५६ च्या औद्योगिक धोरण विषयक ठरावावर आधारलेला होता. या योजनेत सार्वजनिक क्षेत्राच्या विस्तारावर भर देण्यात आला या योजनेत लोखंड व पोलाद आणि अवजड रसायने यांच्या उत्पादनात वाढ करणे, ॲल्युमिनियम, सिमेंट यासारख्या वस्तूंच्या उत्पादन क्षमतेत वाढ करणे, सुती कापड, साखर, ज्युट आशा देशातील महत्वाच्या उद्योगांचे आधुनिकीकरण करणे, उद्योगातील उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर करणे वगैरेंना प्राधान्य देण्यात आले.

४. **दहावी पंचवार्षिक योजना (१ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७) :** ही योजना "Reasonally Differentiated Strategy" जी की कृषी-जलवायु, पर्यावरण आणि प्राकृतिक संसाधनावर आधारित होती. ज्या योजना नव्या पंचवार्षिक योजनेत सुरु केलेल्या होत्या त्या सुरु ठेवणे. या योजनेचा मुख्य भर कृषीवर होता. कृषीचा वृध्दीदर ४ टक्के ठेवला होता तो २.५ टक्के साध्य झाला. आद्योगिक वृध्दीदर १० टक्के ठेवण्यात आला होता तो ८.३ टक्के साध्य झाला.

संशोधन समस्या (Research problem) :

केंद्र शासन व राज्य शासनाने कृषी क्षेत्र व औद्योगिकक्षेत्र यांच्या विकासासाठी विविध योजना राबविलेल्या आहेत. यामुळे कृषी व औद्योगिक क्षेत्राचा विकास होत गेला. परंतु या विकास प्रक्रियेमध्ये बुलडाणा जिल्ह्याचे कृषी व औद्योगिक क्षेत्र किती प्रमाणात विकसित झाले आहे ? बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका काय आहे ? औद्योगिक क्षेत्राची भूमिका कशी आहे ? बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक क्षेत्रामुळे रोजगारावर परिणाम होतो का? बुलडाणा

जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता किती प्रमाणात आहे ? बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रासमोर कोणत्या समस्या आहेत ? बुलडाणा जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील यांत्रीकिकरणाची स्थिती कशी आहे ? कृषी क्षेत्रातील सिंचनसुविधांची उपलब्धता कशी आहे ? कृषी व औद्योगिक क्षेत्राचा विकास झाल्यास जिल्ह्यातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होईल का ? इत्यादी प्रश्नांची मालिका तयार होते. सदर प्रश्नाची उकल करण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of research) :

कृषी हा एक फक्त व्यवसाय नसून, मानवाची प्राथमिक गरज पूर्ण करण्याचे स्त्रोत आहे. पृथ्वीवरील ज्या ज्ञात-अज्ञात संस्कृती उदयाला आल्या व विस्तारल्या त्या नदीच्या सुपीक प्रदेशात यावरुन कृषी क्षेत्राचे महत्व लक्षात येईल. कृषी चा इतिहास जसा प्राचीन आहे तसाच उद्योगांचा ही आहे. शेतीसाठी लागणारे अवजारे (दगडी, लाकडी नंतरच्या काळात लोखंडी) निर्माण केले जात होती. मानवाच्या विकासाबरोबरच उद्योगांचा विकास होत गेला. म्हणजेच मानवाच्या विकासासाठी कृषी व औद्योगिक क्षेत्र किती महत्त्वपूर्ण आहे. बुलडाणा जिल्ह्यामध्ये एकूण ९,६७,००० हेक्टर जमिनीची नोंद आहे. त्यापैकी शेती योग्य जमीन ७४,००० हेक्टर एवढी आहे. जिल्ह्यातील कृषी क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात रोजगार सामावून घेण्याची क्षमता आहे. तसेच उद्योग विकासासाठी ही चालना आहे कृषीच्या विकासासाठी अत्याधुनिक अवजारे, रासायनिक खते, बी-बियाणे हे उद्योगांमध्ये तयार होतात. भारतात जी कृषी क्रांती झाली त्याचे ब-याच प्रमाणात श्रेय अत्याधुनिक अवजारे, रासायनिक खते, बियाणे, सिंचन सुविधा, यांना जाते हे सर्व औद्योगिकरणामुळे शक्य झाले. म्हणजेच उद्योगांचा विकास होत असताना कृषीचा विकास होतो व कृषीचा विकास झाल्यास उद्योगांचा विकास होतो. बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका काय आहे? त्याचा रोजगारावर, उत्पन्नावर, राहणीमानावर काय परिणाम होतो? याचा अभ्यास केल्यास कृषी व औद्योगिक क्षेत्राची स्थिती लक्षात येईल. यावरुन भविष्यकाळात शासनाला जिल्ह्याच्या

विकासासाठी कृषी व औद्योगिक क्षेत्राशी संबंधित नवीन धोरण आखण्यासाठी फायदा होईल. म्हणून या विषयाला महत्त्व प्राप्त होते.

संशोधन विषयाची निवड (Selection of the Research Topic) :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात नियोजन बध्द विकासाला प्रारंभ झाला. केंद्र शासन आणि राज्य शासनाने विकासाकरिता विविध योजना राबविल्या केंद्र शासनाने पहिली पंचवार्षिक योजनेत कृषीला महत्व दिले, तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत उद्योगाला महत्त्व दिले. कृषी व उद्योगांचा विकास करण्यासाठी शासनाने प्रथम दोन योजनेत प्राधान्य दिले. कारण देशाचा आर्थिक विकास करायचा असेल तर, कृषी व औद्योगीकरणाचा विकास करणे गरजेचे आहे. या योजनांमुळे देशाच्या आर्थिक विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. परंतु देशातील सर्व राज्यात सारखा विकास साधला गेला नाही. महाराष्ट्र राज्य हे औद्योगिक दृष्टया देशातील प्रथम क्रमांकाचे विकसित राज्य आहे परंतु राज्यातील ही सर्व जिल्ह्यांचा समतोल विकास साधता आला नाही. काही जिल्हे हे विकसित झाले तर काही जिल्हे कमी विकसित झाली. कृषीच्या बाबतीतही पश्चिम महाराष्ट्र वगळता प्रामुख्याने मराठवाडा व विदर्भ या ठिकाणी सिंचन सुविधा पाहिजे तेवढया प्रमाणात उपलब्ध नाहीत. बुलडाणा जिल्ह्यामध्ये औद्योगीकरण झाले आहे का? किती प्रमाणात झाले आहे? त्याचा आर्थिक विकासावर परिणाम झाला का? बुलडाणा जिल्ह्याचा उद्योगासमोर काही अडचणी आहेत का? कृषीचा विकास झाला का? सिंचन सुविधांची उपलब्धता किती प्रमाणात आहे ? कृषी समोर कोणत्या समस्या आहेत ? बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे काय योगदान आहे? इत्यादी सर्व प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यासाठी "बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगीक क्षेत्राची भूमिका" (२०१०-११ ते २०१९-२०) या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दीष्टे (Objectives of the Research) :

प्रस्तुत अभ्यास हा बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका जाणून घेण्यासाठी हाती घेण्यात आलेला आहे. त्यासाठी पुढील उद्दीष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक क्षेत्राची कामगिरी तपासणे.
२. बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्येगिक क्षेत्रातील रोजगाराचा आढावा घेणे.
३. बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रातील यांत्रीकिकरणाचा आढावा घेणे.
४. बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रातील सिंचन सुविधांचा आढावा घेणे.
५. बुलडाणा जिल्ह्यामध्ये कृषी व औद्योगिक क्षेत्रासाठी असणाऱ्या पायाभूत सोयी सुविधांचा आढावा घेणे.
६. बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक क्षेत्रासमोरील समस्या अभ्यासणे.
७. बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका अभ्यासणे.

गृहितके (Assumptions of the Research) :

प्रस्तुत अभ्यासाठी खालील गृहितके निर्धारित करण्यात आली आहेत.

१. बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.
२. बुलडाणा जिल्ह्यामध्ये कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या विकसामुळे रोजगार निर्मिती, राहणीमान, उत्पन्न यावर सकारात्मक परिणाम होतो.

संशोधन पद्धती (Research Methodology) :

प्रस्तुत अभ्यास हा प्रामुख्याने विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीवर आधारलेला असून, तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रश्नावली व मुलाखतीच्या स्वरूपात माहिती संकलित करण्यात येणार आहे. द्वितीय स्त्रोतामध्ये शासकीय संस्थांची दप्तरे, रेकॉर्डस व अहवाल, जनगणना, भारत सरकार व राज्य सरकार यांचे वार्षिक आर्थिक अहवाल, पंचवार्षिक योजना, औद्योगिक सर्वे, विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, अप्रकाशित शोधप्रबंध इत्यादींचा आधार घेण्यात येणार आहे. अभ्यासासाठी प्रत्यक्ष नमुना पाहणीद्वारे माहिती संकलित करण्यात येणार असून, त्यात सांख्यिकीय माहितीचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये सहेतुक पद्धतीने नमूना निवड करण्यात येणार आहे.

संख्यिकीय साधने (Statistical Instruments) :

विश्लेषणासाठी सरासरी व टक्केवारी या साध्या सांख्यिकीय साधना बरोबर T-टेस्ट या सांख्यिकीय साधनाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच मिळालेल्या आकडेवारीचे विविध सांख्यिकीय मापकांचा उपयोग करून, SPSS चा वापर करून निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. शासकीय योजनेतील केवळ कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी उपलब्ध असणाऱ्या योजनांची निवड केली जाणार आहे.

संशोधन मर्यादा आणि कालखंड (Limitations of the Research and Period) :

प्रस्तुत अभ्यास केवळ बुलडाणा जिल्ह्याकरिता मर्यादित असून या अभ्यासासाठी दहा वर्ष म्हणजेच २०१०-११ ते २०१९-२० हा कालखंड निश्चित करून अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन नमुना निवड तंत्र (Research Sampling Design) :

प्रस्तुत संशोधनासाठी कृषी क्षेत्राच्या अभ्यासासाठी मुलाखत अनुसूची तर, औद्योगिक क्षेत्राच्या अभ्यासासाठी प्रश्नावलीचा वापर माहिती संकलनासाठी केला जाणार आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना समान प्रतिनिधित्व देण्यात येणार आहे. कृषी क्षेत्राच्या अभ्यासासाठी प्रत्येक तालुक्यातील लोकसंख्येच्या निकषानुसार ३ गावांची निवड करण्यात येणार आहे. अशाप्रकारे जिल्ह्यातील १३ तालुक्यातून ३ गावे याप्रमाणे ३९ गावांची निवड करण्यात येणार आहे. प्रत्येक गावातून १० कुटुंबाची सहेतुक पद्धतीने निवड केली जाणार आहे. अशाप्रकारे जिल्ह्यातील १३ तालुक्यातून एकूण ३९० कुटुंबाची निवड करून मुलाखत अनुसूचीच्या साह्याने माहिती संकलित करून निष्कर्ष काढले जाणार आहेत. औद्योगिक क्षेत्रासाठी जिल्ह्यामध्ये एकूण १४३४ औद्योगिक युनिट आहेत. त्यात १२ मोठे उद्योग तर ११ लहान उद्योग असुन उर्वरित १४११ हे लघु उद्योग आहेत. मोठे आणि मध्यम अशा एकूण २३ उद्योगांचा तसेच १४११ लघु उद्योगांच्या ५ टक्के म्हणजेच ७१ लघु उद्योगांचा प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती संकलित करून निष्कर्ष काढले जाणार आहेत.

प्रकारणांची रूपरेषा (Scheme of Chapters) :

१) प्रास्ताविक.

२) संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती.

३) बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रा सबंधित पायाभूत सुविधांचा आढावा

४) बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रासमोरील समस्या

५) बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका.

६) निष्कर्ष व उपाययोजना.

संदर्भ ग्रंथ (Bibliography) :

१. डॉ. सुधीर बोधनकर, प्रा.विवेक अलोणी व ॲड.मुणाल कुलकर्णी (२०११) : सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. डॉ. प्रदिप आगलावे (२०१६) : सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. डॉ. मंगला जंगले (२०१३) : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

४. विजय कविमंडन (२०१२) : कृषी व ग्रामिण अर्थव्यवस्था, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५. प्रा.रायखेलकर व डॉ. दामजी (२०१४) : औद्योगिक अर्थशास्त्र, शशिकांत पिंपळापूरे विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

६. डॉ.मुहम्मद सुलेमान, विनय कुमार चौधरी (२००६) : आधुनिक औद्योगिक एवं संघठनात्मक मनोविज्ञान, मोतीलाल बनारसीदास पब्लिशर्स, जवाहर नगर, दिल्ली.

७. गौरव दत्त, आश्विनी महाजन (२०१८) : दत्त एवं सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था, एस.चांद पब्लिशर्स, नई दिल्ली.

८. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी (२०२१-२२), अर्थ व सांख्यीकी संचालनालय, मुंबई महाराष्ट्र शासन.

९. बुलडाणा जिल्हा वार्षिक अहवाल (२०१७-१८) जिल्हा परिषद बुलडाणा.

१०. Datta S.K. (1998) : Co-operative Societies and Rural Development, Mital Publication, New Delhi.

११. R.R. Barthwal (2000) : Industrial Economics, New Age International Publishers, Hydrabad.

१२. Dr. Mittal, Dr.Agrawal (2018) : Agricultural Economics, Sanjeev Prakashan, Jaipur.

१३. Ramesh Singh (2020) : Indian Economy, McGraw Hill Education (India) Publishers, New Delhi.

१४. M.L. Jhingan (2001) : International Economic, Varinda Publication, New Delhi.

१५. Indian Economic Survey (2021-22) Government of India.

१६. Brief Industrial Profile of Buldhana District.

१७. www.nabard.org

१८. www.bookganga.com

१९. shodhganga.inflibnet.ac.in

२०. agricoop.nic.in

२१. commerce.gov.in

२२. www.buldhanaagriculture.com

२३. mahadesh.maharashtra.gov.in

संशोधक विद्यार्थी
शेख रियाज शेख मुनिर

संशोधन मार्गदर्शक
डॉ.आर.एम. भालेराव
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी.

: शोधप्रबंधाचा आराखडा :

मानव्यविद्या शाखेअंतर्गत **अर्थशास्त्र** विषयात पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
या विद्यापीठास सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधन शीर्षक :

"बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका" (२०१०-११ ते २०१९-२०)

: संशोधक :

शेख रियाज शेख मुनिर

: मार्गदर्शक :

डॉ.आर.एम. भालेराव
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी

: संशोधन केंद्र :

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
परभणी

जुलै २०२२

"बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगीक क्षेत्राची भूमिका" (२०१०-११ ते २०१९-२०)

प्रस्तावना (Introduction) :

भारत हा कृषिप्रधान देश आहे. १९५१ मध्ये ७० टक्के रोजगार हा कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत होता. देशांतर्गत उत्पन्नात कृषीचा वाटा हा ५६.५ टक्के इतका होता. म्हणजेच रोजगार व उत्पन्नाच्या बाबतीत कृषीचा वाटा हा सर्वाधिक होता. विल्सन बार्करबर्सोडी यांच्या मते, "शेती अर्थव्यवस्थेतील मुलभूत क्षेत्र होय, कारण जागतिक लोकसंख्येचा विचार करता अद्यापही बहुसंख्य लोक उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. मानवाची प्राथमिक गरज अन्न हे शेती क्षेत्र पूर्ण करते. आणि अनेक उद्योगांना लागणारा कच्चा माल पुरविण्याचे काम शेतीतून होते. काही कमी विकसित अर्थव्यवस्था प्राथमिक उत्पन्नाच्या मुख्यत्वे शेतमालाच्या निर्यातीवर अवलंबून असतात. म्हणून शेती हाच खरा मूलभूत व्यवसाय आहे असे म्हटले जाते." या विधानावरुन असे लक्षात येईल की, आर्थिक विकासासाठी शेती ही किती महत्वपूर्ण आहे. कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबरच औद्योगिक क्षेत्राचाही विकास होत असतो. कारण औद्योगीकीरणाला आवश्यक असणारा कच्चा माल हे बऱ्याच प्रमाणात शेतीतून पुरविला जातो. साखर, कापड , खाद्यतेल उद्योगाला लागणारा कच्चामाल कृषी क्षेत्रातून उपलब्ध होत असतो.

अर्थव्यवस्थेचे विविध क्षेत्र (प्राथमिक, व्दितीय, तृतीय) परस्पर पूरक असल्याने कोणत्याही एका क्षेत्राचे महत्त्व जास्त राहू शकत नाही. शेतीच्या विकासाशिवाय अनेक उद्योगांचा विकास होणार नाही. तसेच काही उद्योगाच्या विकासाशिवाय शेतीचा विकास होणार नाही जसे की, रासायनिक खते, शेती अवजारे, कीटक नाशके, बी-बियाणे. शेतीच्या विकासासाठी अशा मूलभूत उद्योगांचा विकास होणे आवश्यक असते. कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये औद्योगीकीकरणाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. भारतासारख्या विकसनशील देशात औद्योगिकीकरणामुळे शेती क्षेत्रावरील लोकसंख्येचा भार कमी होतो. उत्पादकतेमध्ये वाढ होते, रोजगार निर्मिती वाढते, दुसऱ्या शब्दात औद्योगिकीकरणामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढते. भारताचे

पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या मते “खरी प्रगती शेवटी औद्योगिकीकरणावरच अवलंबून असते” (Real progress must ultimately depends on industrialisation-Nehru १९५३)

औद्योगिक क्रांतीचे टप्पे :

पहिला टप्पा : १७५० ते १८५० पर्यंतचा आहे. औद्योगिक क्रांतीचा उदय झाला व तिचा प्रसार पूर्व युरोपियन फ्रान्स आणि जर्मनी या देशात झाला.

दुसरा टप्पा : हा १८५० ते १९५० पर्यंतचा आहे. यामध्ये औद्योगिक क्रांतीचा प्रसार रशिया, भारत, जपान, या देशात झाला

तिसरा टप्पा :हा टप्पा १९५० नंतर सुरु झाल व तो आजपर्यंत चालू आहे. आशिया व आफ्रिका खंडात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमध्ये.

भारताच्या औद्योगिकीकरणाची सुरुवात औद्योगीक क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात सुरु झाली तरी, खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारताचे पहिले औद्योगिक धोरण ८ एप्रिल १९४८ रोजी जाहीर झाले व औद्योगिक विकासाला सुरुवात झाली. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांत कृषीमध्ये छुपी बेरोजगारी फार मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते. ज्यांची सीमांत उत्पादकता शून्य असते. हे श्रमिक जर उद्योगाकडे वळविले तर शेतीच्या उत्पन्नात काही परिणाम होणार नाही व त्याचबरोबर उद्योगाला श्रमिक मिळतील. विकसनशील राष्ट्रांमध्ये कृषी-आधारित उद्योगांचा विकास लवकर होऊ शकतो कारण कच्चा माल, श्रमिक मोठया प्रमाणात उपलब्ध होऊ शकतात.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे तर, क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची एकूण लोकसंख्या १९,२३,७४,३३३ इतकी आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.२८ टक्के इतके आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात प्रथम क्रमांकाचे औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. राज्याचा देशांतर्गत उद्योगातील वाटा १८.० टक्के इतका आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण कृषी योग्य जमीन २२५ लक्ष्य हेक्टर असून ४० लक्ष हेक्टर जमिनीवर सिंचन सुविधा आहे. महाराष्ट्रामध्ये कापूस, ऊस, ज्वारी, बाजरी, गहू, सोयाबीन, कडधान्य इत्यादी पिके घेतली जातात. महाराष्ट्रा मध्ये साखर

कारखाने, तेल मिल, सुतगिरणी इत्यादी कृषी आधारित उद्योग आहेत. तसेच यंत्रनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक, धातु शुध्दीकरण, औषध निर्माण, सॉफटवेअर, फिल्म उद्योग बांधकाम इत्यादी उद्योगांचा समावेश होतो.

बुलडाणा जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ९,६६१ चौ. की. आहे. एकुण महाराष्ट्र राज्याच्या ३.१४ टक्के इतके आहे. २०११ जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५.८८ लक्ष एवढी आहे. जिल्ह्याची लोकसंख्या घनता २६८ पर चौ.की. इतकी आहे . बुलडाणा जिल्हा मराराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई पासून ५०० की.मी. अंतरावर आहे. राज्याची उपराजधानी नागपूर पासून ३५० की.मी. अंतरावर आहे. जिल्ह्यातील जमिनीमध्ये नत्र, स्फुरद, पालाश यांचे प्रमाण अनुक्रमे १.०४, १.२६, २.३९ इतके आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने वैनगंगा, पैनगंगा, खडक पूर्णा इत्यादी नद्या आहेत. ज्वारी, कापूस, सोयाबीन, ऊस, कडधान्य इत्यादी पिके घेतली जातात. जिल्ह्यामध्ये नोंदणीकृत औद्योगिक युनिट १४३४ इतके आहे. लघु व कुटीर उद्योगांमध्ये ११,४९३ इतका रोजगार कार्यरत आहे. मोठे उद्योग १२ व मध्यम उद्योग ११ असुन, व त्यामध्ये एकूण रोजगार ५,५७३ कार्यरत आहे.

संशोधन साहित्याचे पुनरावलोकन (Review of the research) :

संशोधनाची उदिष्टे साध्य करण्यासाठी व संशोधन विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी संशोधन विषयाशी संबंधित संशोधन पूर्व अभ्यास करणे गरजेचे आहे.म्हणून बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या संबंधित काही संशोधन साहित्याची निवड करुन अभ्यास केले गेले आहे. असे काही साहित्याचे पुनरावलोकन पुढील प्रमाणे.

१. **अशोक कुमार सिंह (२००७) :** यांनी "जागतिक व्यापार संघटन, भारतीय कृषि समोरील समस्या" या लेखामध्ये कृषी चे जागतिक व्यापरातील योगदान, तसेच कृषी उत्पादनातील गुणवत्ता वाढविण्यासाठी, उत्पादन लागत कमी करणे, विक्री मूल्य कमी करणे व आंतरराष्ट्रीय बाजाराच्या मागणी अनुरुप कृषी उत्पादन करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

२. **डॉ. राधा मोहन श्रीवास्तव (२००२) :** यांनी "कृषी, राष्ट्रीय संसाधन आणि गामीण विकास" या लेखामध्ये कृषीमध्ये रोजगार उपलब्ध करण्यासाठी मोठया प्रमाणावर औद्योगिकीकरणवर भर दिला.

३. **दुसरी पंचवार्षिक योजना (०१ एप्रिल १९५६ ते ३१ मार्च १९६१) :** दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिकीकरणाच्या कार्यक्रमाला सर्वात जास्त प्राधान्य देण्यात आले. मूलभूत व अवजड उद्योगांच्या विकासावर या योजनेत भर देण्यात आला. या योजनेतील औद्योगिकीकरणाचा कार्यक्रम हा १९५६ च्या औद्योगिक धोरण विषयक ठरावावर आधारलेला होता. या योजनेत सार्वजनिक क्षेत्राच्या विस्तारावर भर देण्यात आला या योजनेत लोखंड व पोलाद आणि अवजड रसायने यांच्या उत्पादनात वाढ करणे, ॲल्युमिनियम, सिमेंट यासारख्या वस्तूंच्या उत्पादन क्षमतेत वाढ करणे, सुती कापड, साखर, ज्युट आशा देशातील महत्वाच्या उद्योगांचे आधुनिकीकरण करणे, उद्योगातील उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर करणे वगैरेंना प्राधान्य देण्यात आले.

४. **दहावी पंचवार्षिक योजना (१ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७) :** ही योजना "Reasonally Differentiated Strategy" जी की कृषी-जलवायु, पर्यावरण आणि प्राकृतिक संसाधनावर आधारित होती. ज्या योजना नव्या पंचवार्षिक योजनेत सुरु केलेल्या होत्या त्या सुरु ठेवणे. या योजनेचा मुख्य भर कृषीवर होता. कृषीचा वृध्दीदर ४ टक्के ठेवला होता तो २.५ टक्के साध्य झाला. आद्योगिक वृध्दीदर १० टक्के ठेवण्यात आला होता तो ८.३ टक्के साध्य झाला.

संशोधन समस्या (Research problem) :

केंद्र शासन व राज्य शासनाने कृषी क्षेत्र व औद्योगिकक्षेत्र यांच्या विकासासाठी विविध योजना राबविलेल्या आहेत. यामुळे कृषी व औद्योगिक क्षेत्राचा विकास होत गेला. परंतु या विकास प्रक्रियेमध्ये बुलडाणा जिल्ह्याचे कृषी व औद्योगिक क्षेत्र किती प्रमाणात विकसित झाले आहे ? बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका काय आहे ? औद्योगिक क्षेत्राची भूमिका कशी आहे ? बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक क्षेत्रामुळे रोजगारावर परिणाम होतो का? बुलडाणा

जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता किती प्रमाणात आहे ? बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रासमोर कोणत्या समस्या आहेत ? बुलडाणा जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील यांत्रीकिकरणाची स्थिती कशी आहे ? कृषी क्षेत्रातील सिंचनसुविधांची उपलब्धता कशी आहे ? कृषी व औद्योगिक क्षेत्राचा विकास झाल्यास जिल्ह्यातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होईल का ? इत्यादी प्रश्नांची मालिका तयार होते. सदर प्रश्नाची उकल करण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of research) :

कृषी हा एक फक्त व्यवसाय नसून, मानवाची प्राथमिक गरज पूर्ण करण्याचे स्त्रोत आहे. पृथ्वीवरील ज्या ज्ञात-अज्ञात संस्कृती उदयाला आल्या व विस्तारल्या त्या नदीच्या सुपीक प्रदेशात यावरुन कृषी क्षेत्राचे महत्व लक्षात येईल. कृषी चा इतिहास जसा प्राचीन आहे तसाच उद्योगांचा ही आहे. शेतीसाठी लागणारे अवजारे (दगडी, लाकडी नंतरच्या काळात लोखंडी) निर्माण केले जात होती. मानवाच्या विकासाबरोबरच उद्योगांचा विकास होत गेला. म्हणजेच मानवाच्या विकासासाठी कृषी व औद्योगिक क्षेत्र किती महत्त्वपूर्ण आहे. बुलडाणा जिल्ह्यामध्ये एकूण ९,६७,००० हेक्टर जमिनीची नोंद आहे. त्यापैकी शेती योग्य जमीन ७४,००० हेक्टर एवढी आहे. जिल्ह्यातील कृषी क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात रोजगार सामावून घेण्याची क्षमता आहे. तसेच उद्योग विकासासाठी ही चालना आहे कृषीच्या विकासासाठी अत्याधुनिक अवजारे, रासायनिक खते, बी-बियाणे हे उद्योगांमध्ये तयार होतात. भारतात जी कृषी क्रांती झाली त्याचे ब-याच प्रमाणात श्रेय अत्याधुनिक अवजारे, रासायनिक खते, बियाणे, सिंचन सुविधा, यांना जाते हे सर्व औद्योगिकरणामुळे शक्य झाले. म्हणजेच उद्योगांचा विकास होत असताना कृषीचा विकास होतो व कृषीचा विकास झाल्यास उद्योगांचा विकास होतो. बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका काय आहे? त्याचा रोजगारावर, उत्पन्नावर, राहणीमानावर काय परिणाम होतो? याचा अभ्यास केल्यास कृषी व औद्योगिक क्षेत्राची स्थिती लक्षात येईल. यावरुन भविष्यकाळात शासनाला जिल्ह्याच्या

विकासासाठी कृषी व औद्योगिक क्षेत्राशी संबंधित नवीन धोरण आखण्यासाठी फायदा होईल. म्हणून या विषयाला महत्त्व प्राप्त होते.

संशोधन विषयाची निवड (Selection of the Research Topic) :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात नियोजन बध्द विकासाला प्रारंभ झाला. केंद्र शासन आणि राज्य शासनाने विकासाकरिता विविध योजना राबविल्या केंद्र शासनाने पहिली पंचवार्षिक योजनेत कृषीला महत्व दिले, तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत उद्योगाला महत्त्व दिले. कृषी व उद्योगांचा विकास करण्यासाठी शासनाने प्रथम दोन योजनेत प्राधान्य दिले. कारण देशाचा आर्थिक विकास करायचा असेल तर, कृषी व औद्योगीकरणाचा विकास करणे गरजेचे आहे. या योजनांमुळे देशाच्या आर्थिक विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. परंतु देशातील सर्व राज्यात सारखा विकास साधला गेला नाही. महाराष्ट्र राज्य हे औद्योगिक दृष्टया देशातील प्रथम क्रमांकाचे विकसित राज्य आहे परंतु राज्यातील ही सर्व जिल्ह्यांचा समतोल विकास साधता आला नाही. काही जिल्हे हे विकसित झाले तर काही जिल्हे कमी विकसित झाली. कृषीच्या बाबतीतही पश्चिम महाराष्ट्र वगळता प्रामुख्याने मराठवाडा व विदर्भ या ठिकाणी सिंचन सुविधा पाहिजे तेवढया प्रमाणात उपलब्ध नाहीत. बुलडाणा जिल्ह्यामध्ये औद्योगीकरण झाले आहे का? किती प्रमाणात झाले आहे? त्याचा आर्थिक विकासावर परिणाम झाला का? बुलडाणा जिल्ह्याचा उद्योगासमोर काही अडचणी आहेत का? कृषीचा विकास झाला का? सिंचन सुविधांची उपलब्धता किती प्रमाणात आहे ? कृषी समोर कोणत्या समस्या आहेत ? बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे काय योगदान आहे? इत्यादी सर्व प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यासाठी “बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगीक क्षेत्राची भूमिका” (२०१०-११ ते २०१९-२०) या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दीष्टे (Objectives of the Research) :

प्रस्तुत अभ्यास हा बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका जाणून घेण्यासाठी हाती घेण्यात आलेला आहे. त्यासाठी पुढील उद्दीष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक क्षेत्राची कामगिरी तपासणे.

२. बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्येगिक क्षेत्रातील रोजगाराचा आढावा घेणे.

३. बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रातील यांत्रीकिकरणाचा आढावा घेणे.

४. बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रातील सिंचन सुविधांचा आढावा घेणे.

५. बुलडाणा जिल्ह्यामध्ये कृषी व औद्योगिक क्षेत्रासाठी असणाऱ्या पायाभूत सोयी सुविधांचा आढावा घेणे.

६. बुलडाणा जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक क्षेत्रासमोरील समस्या अभ्यासणे.

७. बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका अभ्यासणे.

गृहितके (Assumptions of the Research) :

प्रस्तुत अभ्यासाठी खालील गृहितके निर्धारित करण्यात आली आहेत.

१. बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

२. बुलडाणा जिल्ह्यामध्ये कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या विकसामुळे रोजगार निर्मिती, राहणीमान, उत्पन्न यावर सकारात्मक परिणाम होतो.

संशोधन पद्धती (Research Methodology) :

प्रस्तुत अभ्यास हा प्रामुख्याने विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीवर आधारलेला असून, तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतामध्ये प्रश्नावली व मुलाखतीच्या स्वरूपात माहिती संकलित करण्यात येणार आहे. द्वितीय स्त्रोतामध्ये शासकीय संस्थांची दप्तरे, रेकॉर्डस व अहवाल, जनगणना, भारत सरकार व राज्य सरकार यांचे वार्षिक आर्थिक अहवाल, पंचवार्षिक योजना, औद्योगिक सर्वे, विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, अप्रकाशित शोधप्रबंध इत्यादींचा आधार घेण्यात येणार आहे. अभ्यासासाठी प्रत्यक्ष नमुना पाहणीद्वारे माहिती संकलित करण्यात येणार असून, त्यात सांख्यिकीय माहितीचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये सहेतुक पद्धतीने नमूना निवड करण्यात येणार आहे.

संख्यिकीय साधने (Statistical Instruments) :

विश्लेषणासाठी सरासरी व टक्केवारी या साध्या सांख्यिकीय साधना बरोबर T-टेस्ट या सांख्यिकीय साधनाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच मिळालेल्या आकडेवारीचे विविध सांख्यिकीय मापकांचा उपयोग करून, SPSS चा वापर करून निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. शासकीय योजनेतील केवळ कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी उपलब्ध असणाऱ्या योजनांची निवड केली जाणार आहे.

संशोधन मर्यादा आणि कालखंड (Limitations of the Research and Period) :

प्रस्तुत अभ्यास केवळ बुलडाणा जिल्ह्याकरिता मर्यादित असून या अभ्यासासाठी दहा वर्ष म्हणजेच २०१०-११ ते २०१९-२० हा कालखंड निश्चित करून अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन नमुना निवड तंत्र (Research Sampling Design) :

प्रस्तुत संशोधनासाठी कृषी क्षेत्राच्या अभ्यासासाठी मुलाखत अनुसूची तर, औद्योगिक क्षेत्राच्या अभ्यासासाठी प्रश्नावलीचा वापर माहिती संकलनासाठी केला जाणार आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना समान प्रतिनिधित्व देण्यात येणार आहे. कृषी क्षेत्राच्या अभ्यासासाठी प्रत्येक तालुक्यातील लोकसंख्येच्या निकषानुसार ३ गावांची निवड करण्यात येणार आहे. अशाप्रकारे जिल्ह्यातील १३ तालुक्यातून ३ गावे याप्रमाणे ३९ गावांची निवड करण्यात येणार आहे. प्रत्येक गावातून १० कुटुंबाची सहेतुक पद्धतीने निवड केली जाणार आहे. अशाप्रकारे जिल्ह्यातील १३ तालुक्यातून एकूण ३९० कुटुंबाची निवड करून मुलाखत अनुसूचीच्या साह्याने माहिती संकलित करून निष्कर्ष काढले जाणार आहेत. औद्योगिक क्षेत्रासाठी जिल्ह्यामध्ये एकूण १४३४ औद्योगिक युनिट आहेत. त्यात १२ मोठे उद्योग तर ११ लहान उद्योग असुन उर्वरित १४११ हे लघु उद्योग आहेत. मोठे आणि मध्यम अशा एकूण २३ उद्योगांचा तसेच १४११ लघु उद्योगांच्या ५ टक्के म्हणजेच ७१ लघु उद्योगांचा प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती संकलित करून निष्कर्ष काढले जाणार आहेत.

प्रकारणांची रूपरेषा (Scheme of Chapters) :

१) प्रास्ताविक.

२) संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती.

३) बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रा सबंधित पायाभूत सुविधांचा आढावा

४) बुलडाणा जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रासमोरील समस्या

५) बुलडाणा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी व औद्योगिक क्षेत्राची भूमिका.

६) निष्कर्ष व उपाययोजना.

संदर्भ ग्रंथ (Bibliography) :

१. डॉ. सुधीर बोधनकर, प्रा.विवेक अलोणी व अॅड.मुणाल कुलकर्णी (२०११) : सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. डॉ. प्रदिप आगलावे (२०१६) : सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. डॉ. मंगला जंगले (२०१३) : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

४. विजय कविमंडन (२०१२) : कृषी व ग्रामिण अर्थव्यवस्था, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५. प्रा.रायखेलकर व डॉ. दामजी (२०१४) : औद्योगिक अर्थशास्त्र, शशिकांत पिंपळापूरे विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

६. डॉ.मुहम्मद सुलेमान, विनय कुमार चौधरी (२००६) : आधुनिक औद्योगिक एवं संघठनात्मक मनोविज्ञान, मोतीलाल बनारसीदास पब्लिशर्स, जवाहर नगर, दिल्ली.

७. गौरव दत्त, आश्विनी महाजन (२०१८) : दत्त एवं सुंदरम भारतीय अर्थव्यवस्था, एस.चांद पब्लिशर्स, नई दिल्ली.

८. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी (२०२१-२२), अर्थ व सांख्यीकी संचालनालय, मुंबई महाराष्ट्र शासन.

९. बुलडाणा जिल्हा वार्षिक अहवाल (२०१७-१८) जिल्हा परिषद बुलडाणा.
१०. Datta S.K. (1998) : Co-operative Societies and Rural Development, Mital Publication, New Delhi.
११. R.R. Barthwal (2000) : Industrial Economics, New Age International Publishers, Hydrabad.
१२. Dr. Mittal, Dr.Agrawal (2018) : Agricultural Economics, Sanjeev Prakashan, Jaipur.
१३. Ramesh Singh (2020) : Indian Economy, McGraw Hill Education (India) Publishers, New Delhi.
१४. M.L. Jhingan (2001) : International Economic, Varinda Publication, New Delhi.
१५. Indian Economic Survey (2021-22) Government of India.
१६. Brief Industrial Profile of Buldhana District.
१७. www.nabard.org
१८. www.bookganga.com
१९. shodhganga.inflibnet.ac.in
२०. agricoop.nic.in
२१. commerce.gov.in
२२. www.buldhanaagriculture.com
२३. mahadesh.maharashtra.gov.in

संशोधक विद्यार्थी
शेख रियाज शेख मुनिर

संशोधन मार्गदर्शक
डॉ.आर.एम. भालेराव
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी.